जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक -२६३ दिनांक - २१/०६/२०२४**

भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन,पुणे शहर

**कात्रज नवीन हायवेवरील स्वामी नारायण मंदीराजवळील पडक्या उंच इमारतीवरुन जिवाची पर्वा न करता धोकादायक रिल्स बनविणा-यांवर तरुण व तरुणीवर गुन्हा दाखल**

दिनांक २०/०६/२०२४ रोजी नवीन कात्रज हायवे वरील स्वामी नारायण मंदीर येथील पडक्या उंच इमारतीवरुन एक तरुणी व एक तरुण यांनी त्यांचा जिव धोक्यात टाकुन एक धोकादायक व्हीडीओ तयार करुन त्याची रिल्स बनविली होती. ती रिल्स सोशल मिडीआवर व्हायरल झाली होती. त्यावेळी भारती विद्यापीठ पोलीसांनी व्हीडीओची खात्री करुन एक अनोळखी तरुण मुलगा व एक अनोळखी तरुण मुलगी यांचेवर स्वतःचे व इतरांचे जिवीत व व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणारी कृती केली आहे म्हणुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर ५१५/२०२४, भादंवि कलम ३३६,३४ अन्वये गुन्हा दाखल केला असुन सदर तरुण व तरुणीचा शोध चालु आहे. त्यांचा शोध घेवुन कायदेशीर कारवाई करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ २,पुणे शहर श्रीमती स्मार्तना पाटील, मा.सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग,पुणे श्रीमती नंदीनी वग्याणी, यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.डी.एस.पाटील,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री शरद झिने,व भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन कडील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केली आहे.